जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १७.१०.२०२५**

" नाशिक–मुंबई हायवेवर वाहने अडवून अग्निशस्त्रासह दरोडा टाकण्याचे तयारीत असणारे झारखंडी नक्षली व अन्य पाच आरोपी यांना 03 अग्निशस्त्रासह अटक"

मालमत्ता गुन्हे कक्षाच्या नेमणुकीतील पोहवा/संदीप भागरे यांना गोपनिय बातमीदारांमार्फत मिळालेल्या बातमीवरून मालमत्ता गुन्हे शोध कक्षाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक 14/10/2025 रोजी 18:35 वा. खारेगाव टोल नाक्याकडून कळवा बाजूकडे जाणारे रोडवर, टोल नाक्यापासुन सुमारे 200 मिटर अंतरावर रोडवर ठाणे प. याठिकाणी सापळा कारवाई करून बोलेरो मोटार कार क्र.JH-01-CX-4728 या वाहनातून झारखंड येथून येवून नाशिक मुंबई हायवे रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनांना थांबवुन त्यांना प्राण घातक शस्त्रांचा धाक दाखवुन तसेच त्यांच्या डोळ्यात मिरची पुड टाकुन त्यांच्या कडील मौल्यवान ऐवज चोरी करण्याच्या उद्देशाने स्वतःकडे 03 अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे बाळगुन तसेच बोलेरो मोटार कार क्र.JH-01-CX-4728 या वाहनात दरोडयाकरीता लागणारे साहीत्य, लोखंडी कटावणी, कोयता, मिरची पूड, व रस्सी असे बाळगुन दरोडा टाकण्याचे तयारीत असणारे झारखंड येथील नक्षलवादी इसम नामे 1) राजेंद्र महेश यादव वय 27 वर्षे रा. ग्राम हाहेबरली, पो.मोरपिरी, थाना बुडमोह, जि.रांची (झारखंड) 2) मोहमंद सरफराज अब्दुल सत्तार अन्सारी वय 36 वर्षे, रा.ग्राम पोस्ट इरबा, थाना ओरमांझी, जि.रांची (झारखंड) 3) अब्दल रहीम सलीम अन्सारी वय 30 वर्षे, रा.ग्राम बलसोकरा, पो.पंडरी, थाना चानहो जि.रांची (झारखंड) 4) सदद्ाम अबुल अन्सारी वय 30 वर्षे, रा.ग्राम महु गाव, पो.चरहु, थाना बगडू जि.लोहरदग्गा (झारखंड), 5) शिवकुमार चौठा उराव वय 40 वर्षे रा.ग्राम कुरसे कुंबा टोली, पो.कुरसे, थाना लोहरदग्गा, जि.लोहरदग्गा (झारखंड) 6) अरविंद बाबूराम यादव वय 21 वर्षे, रा.ग्राम नडीयावा, पो.भवानीगंज, ता. डुमरीयागंज, जि.सिध्दार्थनगर (यु.पी) यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून बोलेरो मोटार वाहन क्र.JH-01-CX-4728 यासह 03 अग्निशस्त्रे, 04 जिवंत काडतुसे, 01 लोखंडी कोयता, 01 लोखंडी कटावणी, मिरची पुड, रस्सी तसेच एकुण 06 मोबाईल असा एकुण 7,96,900/– रू. किमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.

सदर आरोपींविरूध्द कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.न. 799/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 310(4), (6) सह भा.ह.का. 3, 25 सह 4, 25 सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37(1), 135 प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना गुन्हयात अटक करून मोलाची कामगिरी केली आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त गुन्हे, ठाणे, श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शोध–2, गुन्हे, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनि/गोरखनाथ घार्गे, सपोनिरी/अब्दुल मलीक, पोउनि/संजय भिसे, सपोउनि/शिवाजी गायकवाड, पोहवा/दिनेश कुंभारे, पोहवा/प्रशांत भुर्के, पोहवा/संदीप भांगरे, पोहवा/महेश साबळे, पोहवा/अनुप कामत, पोहवा/जयकर जाधव, पोहवा/4888 राहुल शिरसाठ, पोना/सचिन कोळी, पोना/6626 तौसीफ सैयद, पो.अंम./अशोक पाटील, पोअं/महेश सावंत, चापोअं/सदन मुळे, व मपोहवा/आशा गोळे, मपोना/गिताली पाटील यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर